दि. 22/11/2017

# <u>जाहीर निवेदन</u>

**विषय :- श्वानदंश लस (Anti Rabies Vaccine)खरेदीसाठी दरपत्रके मागविणे बाबत.**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते कि, सन 2017-18 मध्ये जिल्हा परिषद सेसफंडांतर्गत प्राप्त तरतुद रु 1.00 लक्ष मधुन जनावरांना पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर द्यावयाची श्वानदंश लस (Post Bite Anti Rabies Vaccine) टोचणे आवश्यक असल्याने श्वानदंश लस (Anti Rabies Vaccine) (1 मि.ली. व्हायल) खरेदी करणेसाठी अधिकृत कंपनीचे लस पुरवठाधारकाकडुन दरपत्रके (कोटेशन) याद्वारे मागविण्यात येत आहेत. तरी परभणी मुख्यालयी लसमात्रा (Home Delivery) पुरवठा करण्यासह व इतर सर्व करासहीतचे दरपत्रके सदर पत्रकाच्या दिनांकापासुन 10 दिवसाचे आत (1/12/17 पर्यंत) बंद पॉकीटात निम्नस्वाक्षरीतांस पोंहचतील याप्रमाणे पाठविण्यात यावेत, विहीतमुदतीनंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच Authorised Manufacturring Co. चे ॲथॉरिटीचे प्रमाणपत्र व लसमात्राची Expiry हि किमान 1 वर्षाची असणे गरजेची आहे, सदर लसमात्राच्या गुणवत्तेबाबत प्रमाणीत प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच ज्या पुरवठाधारकांचे दर सर्वात कमी असतील त्यांना लसमात्रा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील. सदर दरपत्रके दिनांक 5/12/2017 रोजी दुपारी 3.00 वाजता गठीत केलेल्या जिल्हा खरेदी समिती समोर उघडण्यात येतील.

उपरोक्त दरपत्रके उघडण्याच्या दिनांकात काही बदल करावायचा झाल्यास त्याचे अधिकार मा. अध्यक्ष, जिल्हा खरेदी समिती तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. परभणी यांना राहतिल.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद परभणी